**संदर्भ :-** १. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक मवैअ २०१५/प्र.क्र.७३९/निम/सेवा-३ दिनांक २४ जून २०१६.

२. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक मवैअ २०१६/प्र.क्र.९५/सेवा- ३,दि.२९ ऑगस्ट, २०१६.

३. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक मवैअ २०१६/प्र.क्र.९५/सेवा- ३,दि.२० सप्टेंबर, २०१६.

४. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक मवैअ २०१५/प्र.क्र.७३९/निम/सेवा-३ दिनांक २६ ऑक्टोंबर २०१६.

५. सहसचिव,महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक मवैअ २०१६/प्र.क्र.८७५/ १६/ सेवा३, दिनांक १६ नोव्हेंबर २०१६.

६. कक्ष अधिकारी,महा. शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन पत्र क्रमांकः मवैअ -२०१६/ प्र.क्र.९५/सेवा-३,दिनांक १९ जून,२०१७

७. जिल्हा निवड समिती,गडचिरोलीचे कार्यवृत्त दिनांक ०८/०८/२०१७

---

क्रमांक/जिपग/आरोग्य/स्था-१/1030 ~~३२८९~~/२०१७
कार्यालय जिल्हा परिषद गडचिरोली
(आरोग्य विभाग)
दिनांक :- १९/८ /२०१७

## आदेश

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयातील तरतूदीनुसार जिल्हा निवड समिती गडचिरोली द्वारा निवड केलेल्या निम्नलिखीत उमेदवारांची, पात्र ठरलेल्या एम.बी.बी.एस शैक्षणीक अर्हतेनूसार महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा **वैद्यकिय अधिकारी गट -अ** या पदावर वेतनश्रेणी रु. १५६००-३९१००/- ग्रेड वेतन ५४००/- मध्ये दरमहा नियमाप्रमाणे मिळणाऱ्या इतर भत्यासह आदेशात नमुद केलेल्या अटी व शर्तीवर नामनिर्देशनाने अस्थायीरीत्या नेमणूक करण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या ठिकाणी पूढिल आदेशापर्यंत करण्यात येत आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | पदस्थापनेचे ठिकाण | नियुक्तीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ |
| १ | डॉ. शेखर मंगेश दोरखंडे<br>मु.पो.रासा ता. वणी जि. यवतमाळ ४४५३०४ | ग्रामीण रुग्णालय, धानोरा<br>तालुका धानोरा | इतर मागास वर्ग |
| २ | डॉ.अश्विन वसंतराव वलके<br>९३४, लक्ष्मीपूर वार्ड क्रं. २, हॉकी ग्राऊंड जवळ, रामपुर रोड, अहेरी ता.अहेरी जि.गडचिरोली | ग्रामीण रुग्णालय,सिरोंचा<br>तालुका सिरोंचा | अनुसूचित जमाती |
| ३ | डॉ.अभिजीत पुरुषोत्तम गादेवार<br>मु.पो. ता.एटापल्ली जि.गडचिरोली ४४२७०४ | प्राथमिक आरोग्य केंद्र,गट्टा<br>तालुका एटापल्ली | खुला प्रवर्ग |
| ४ | डॉ.मनिष भिक्षुक रामटेके<br>रुक्मिनी नगर, आरमोरी रोड, डॉ.गेडाम यांच्या घराजवळ,ब्रम्हपुरी ता.ब्रम्हपुरी जि.चंद्रपूर | प्राथमिक आरोग्य केंद्र,बोटेकसा<br>तालुका कोरची | खुला प्रवर्ग |
| ५ | डॉ.देवेंद्र डोमडूजी सावसाकडे<br>द्वारा-भारत जी.राणे, गायत्रीनगर, बर्डी-आरमोरी ता.आरमोरी जि.गडचिरोली | ग्रामीण रुग्णालय, धानोरा<br>तालुका धानोरा | अनुसूचित जमाती |
| ६ | डॉ.सचिन चरण कवाडकर<br>द्वारा-सी.पी.कवाडकर, ४५-अ, आंबेडकर वार्ड, कुरखेडा ता.कुरखेडा जि.गडचिरोली ४४१२०९ | ग्रामीण रुग्णालय,कोरची<br>तालुका कोरची | इतर मागास वर्ग |
| ७ | डॉ.प्रतीक प्रभाकर गोजे<br>द्वारा-प्रभाकर घु. माटे, अभ्यंकर वार्ड, बोबडे कॉलनी,वरोरा ता.वरोरा जि.चंद्रपूर ४४२९०७ | प्राथमिक आरोग्य केंद्र,कमलापूर<br>तालुका अहेरी | इतर मागास वर्ग |
| ८ | डॉ.नरेंद्र आत्माराम खोबा<br>मु.मोहगांव पो.बेडगांव ता.कोरची जि.गडचिरोली | प्राथमिक आरोग्य पथक,मसेली<br>तालुका कोरची | अनुसूचित जमाती |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | डॉ.कोमल अरुण पाटील<br>प्लॅट-१३४, जुने डी.आ.जी.ऑफीस, पोलीस संकुल, गडचिरोली जि.गडचिरोली | तालुका आरोग्य अधिकारी,<br>तालुका धानोरा | खुला प्रवर्ग |
| १० | डॉ.कुनाल सुरेश मोडक<br>क्रं. २०४, भाग्यश्री लेआऊट,त्रिमुर्ती नगर,नागपूर जि.नागपूर | प्राथमिक आरोग्य केंद्र,गोडलवाही<br>तालुका धानोरा | अनुसूचित जाती |
| ११ | डॉ.मनिष अरुण धकाते<br>जि.प.प्राथमिक शाळेजवळ,आरमोरी ता.आरमोरी जि.गडचिरोली ४४१२०८ | ग्रामीण रुग्णालय,सिरोंचा<br>तालुका सिरोंचा | खुला प्रवर्ग |
| १२ | डॉ. जयनित यशवंत मालविय<br>मु.गंभेरी पो.भोकरबर्डी ता.धारणी जि.अमरावती ४४४७१९ | ग्रामीण रुग्णालय,कोरची<br>तालुका कोरची | इतर मागास वर्ग |

**नेमणूक खाली दिलेल्या अटी व शर्तीनूसार देण्यात येत आहे**

१. सदर वैद्यकिय अधिकारी यांची वैद्यकिय तपासणी व पुर्व चारीत्र्य पडताळणी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र सहा महिण्याचे आंत प्राप्त करुन घ्यावे. सदरील प्रमाणपत्रांची विहीत मुदतीत पुर्तता करण्याबाबतची जबाबदारी जिल्हा आरोग्य अधिकारी ,जिल्हा परिषद,गडचिरोली यांची राहील.
२. आवश्यकतेनुसार जात वैधता प्रमाणपत्र तसेच अप्रगत गटात मोडत असल्यास(नॉन क्रिमिलेयर) प्रमाणपत्र या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिण्याचे आत सादर करावे. या प्रमाणपत्रांची पुर्तता सहा महिण्याच्या कालावधीत न झाल्यास त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. सदरील प्रमाणपत्राची विहीत मुदतीत पुर्तता करुन घेण्याची जबाबदारी संबधित जिल्हा आरोग्य अधिकारी यांची राहील.
३. तसेच वैद्यकिय अधिकारी यांची मुळ प्रमाणपत्रे,कागदपत्रे व वयोमर्यादा पुन्हा एकदा तपासून त्यानंतर नियुक्तीच्या ठिकाणी हजर करुन घ्यावे.
४. महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकिय अधिकारी पदाचा कार्यभार धारण केलेल्या दिनांकापासून दोन वर्ष इतका कालावधी हा परिविक्षाधिन स्वरुपाचा राहील.परिविक्षाधिन कालावधीत त्यांनी कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा वर्तणूक अयोग्य आढळल्यास त्यांची सेवा संपुष्ठात आणली जाईल किंवा त्यांचा परिविक्षाधिन कालावधी एक वर्षाचे कालावधीसाठी वाढविला जाईल. त्या वाढविलेल्या कालावधीमध्ये देखील त्यांचे काम समाधानकारक झाले नाही तर, त्यांची सेवा कोणत्याही पुर्व सुचनेशिवाय समाप्त करण्यात येईल.
५. नियुक्त केलेल्या उमेदवारांची ३ वर्षापर्यत बदली होणार नाही व त्यांच्या बदलीच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. मा.लोकप्रतिनिधी वा अन्य माध्यमातून बदलीबाबत शासनावर दबाव आणल्यास / आल्यास संबधित उमेदवाराकडून सदरची कृती केल्याचे ग्राहय धरुन, संबधित उमेदवार महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र राहतील किंबहुना नियुक्तीच्या आदेशामधील अटी शर्तीचा भंग समजून विना चौकशी त्यांच्या सेवा समाप्तीबाबत कारवाई केली जाईल.
६. परिविक्षा कालावधीमधील वेतनवाढ शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार अनुज्ञेय राहील.परिविक्षा कालावधी पुर्ण केल्याशिवाय त्यांना पुढील वेतनवाढ अनुज्ञंय होणार नाही.
७. त्यांच्या नावाची नोंदणी महाराष्ट्र वैद्यकिय व्यवसायीक अधिनियम, १९६१ अथवा महाराष्ट्र वैद्यकिय परिषद अधिनियम, १९६५ खाली या नियुक्तीपुर्वी केली असली पाहिजे किंवा भारतीय वैद्यकिय नोंदवहीमध्ये नियुक्तीपुर्वी नोंद झाली असली पाहिजे.
८. त्यांना एक पत्नी / पती हयात असतांना दुसरा विवाह करता येणार नाही.
९. एक महिण्यांची पुर्व सुचना दिल्याशिवाय अगर एक महिण्यांची आगाऊ वेतनपुर्ती केल्याशिवाय त्यांना सेवामुक्त होता येणार नाही.
१०. त्यांना त्यांचे सेवा कालावधीत केंद्र शासनाने विहीत केलेल्या अटीवर चार वर्षाच्या कालावधीकरिता (प्रशिक्षण कालावधी धरुन) जरुरी पडल्यास भारत संरक्षण किंवा संरक्षण सेवेशी संबधित अशा पदावर त्यांना काम करावे लागेल, हे दायित्व सेवेच्या पहिल्या दहा वर्षापर्यत मर्यादित राहील व ४५ वर्षे वयानंतर सर्वसाधारणपणे लागू होणार नाही.

११. त्यांना शासन विहीत करील त्याप्रमाणे प्रशिक्षण पार पाडावे लागेल. सदर उमेदवारांना ३ वर्ष सेवा कालावधी पुर्ण केल्याशिवाय पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेता येणार नाही.

१२. त्यांना खाजगी व्यवसाय करण्यास प्रतिबंध राहील.

१३. त्यांनी हिन्दी आणि मराठी भाषा परिक्षेसंबधिच्या नियमावलीनुसार जर ते या परिक्षा अगोदरच उत्तीर्ण झाले नसतील किंवा उत्तिर्ण होण्यापासून त्यांना सूट मिळाली नसेल तर त्यांनी एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी विषयाची परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा तदनंतर त्यांच्या पुढील वेतनवाढी रोखून ठेवण्यात येतील.

१४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-प्रशिक्षण-२०००/प्र.क्र. ६१/२००१/३९, दिनांक १९.३.२००३ शासन सेवेतील नियुक्तीकरिता संगणक हाताळणी / वापरावयाचे ज्ञान एक अतिरिक्त आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आले आहे. यास्तव या शासन निर्णयाद्वारे नियुक्ती देण्यात येणाऱ्या वैद्यकिय अधिकाऱ्यांनी शासन मान्यता प्राप्त संगणक हाताळणी / वापराबाबतचे आवश्यक ते प्रमाणपत्र जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,गडचिरोली यांचेकडे सेवेत रुजू झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

१५. या उमेदवारांना शासन सेवेत कमीत कमी पाच वर्ष राहण्याचे किंवा न राहील्यास रुपये ५००/- अगर शासन वेळोवेळी विहीत करील ती रक्कम दंड म्हणून देण्याचे बंधन राहील. तसेच इतर सेवा शर्तीच्या पुर्ततेसाठी बंधपत्र लिहून द्यावे लागेल.

१६. सदर उमेदवारांना मुख्यालयी राहणे अत्यावश्यक राहील व त्यांचे वेतन हे बायोमेट्रिक हजेरीशी सलग्नं असेल.

१७. शासनाने दिलेल्या निवासस्थानामध्ये राहणे बंधनकारक राहील तसेच ते भाडयाने देता येणार नाही.

१८. राष्ट्रिय आरोग्य अभियान व अन्य शासनाकडून वेळोवेळी जाहीर करण्यात येणारी आरोग्य विषयक अभियान, नागरीकांची सनद, सेवा हमी कायदा, मुख्यालयाकडून येणारे आदेश यांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

१९. उमेदवाराने पदस्थापनेचे आदेश प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून **१५ दिवसांच्या** आत त्यांच्या नेमणूकीच्या ठिकाणी रुजू झाले पाहिजे. अन्यथा **१५ दिवसानंतर** सदर नियुक्तीचे आदेश आपोआपच रद्द होतील. १५ दिवसानंतर संबधित जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,गडचिरोली यांनी हजर करुन घेवू नये.

२०. स्वतंत्र निवड मंडळाने जाहीर केलेल्या यादीतील उमेदवारांची जेष्ठता यादीत दर्शविलेल्या गुणांवर आधारीत गुणानुक्रमानुसार (Merit List) ठरविण्यात येईल व त्या संबधिचे आदेश स्वतंत्र निवड मंडळाकडून स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

२१. महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट-अ या संवर्गातील नामनिर्देशनाने नियुक्ती झाल्यावर त्यांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील तरतुदीनुसार निश्चित केले जाईल.

२२. सदर उमेदवारांना वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक- अंनियो-२००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ च्या तरतुदीनुसार "परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन" योजना लागू करण्यात आलेली आहे. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

२३. उमेदवाराने पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होतांना विहीत नमुन्यातील सांक्षांकन नमुना, आवश्यक ती माहिती भरुन संबधित कार्यालय प्रमुखाकडे सादर करावा. कार्यालय प्रमुखाने सदर सांक्षाकन नमुना सह संचालक(प्रशासन व अर्थ संकल्प), आरोग्य सेवा मुंबई यांच्याकडे १५ दिवसात पाठवावा व त्याची पोहच सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,गडचिरोली यांचेकडे सादर करावी.

२४. सदर आदेश जिल्हा परिषदेच्या www.zpgadchiroli.org व एन.आय.सी.च्या www.gadchiroli.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी गडचिरोली**

**प्रतिलीपी:-**

१. मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई यांना माहितीस सविनय सादर.
२. मा.संचालक,आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,गडचिरोली यांना माहितीस अग्रेषित.
४. सह संचालक(प्रशासन व अर्थसंकल्प) आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई यांना माहितीस अग्रेषित.
५. उपसंचालक,आरोग्य सेवा, नागपूर मंडळ,नागपूर यांना माहितीस अग्रेषित.
६. उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सामान्य),जिल्हा परिषद,गडचिरोली यांना माहितीस अग्रेषित.
७. जिल्हा शल्य चिकित्सक,सामान्य रुग्णालय,गडचिरोली यांना माहितीस अग्रेषित.
८. जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,गडचिरोली यांना माहितीस तथा कार्यवाहीस अग्रेषित.
९. जिल्हा कोषागार अधिकारी,गडचिरोली यांना माहितीस अग्रेषित.
१०. गट विकास अधिकारी,पंचायत समिती,------------------ यांना माहितीस तथा कार्यवाहीस अग्रेषित.
११. तालुका आरोग्य अधिकारी,तालुका----------------- यांना माहितीस तथा कार्यवाहीस अग्रेषित.
१२. वैद्यकिय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र / पथक,--------------------- यांना माहितीस तथा कार्यवाहीस अग्रेषित.
१३. वैद्यकिय अधिकारी,जिल्हा प्रशिक्षण पथक,गडचिरोली यांना माहितीस तथा कार्यवाहीस अग्रेषित.
१४. प्रशासकिय अधिकारी,आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,गडचिरोली यांना माहितीस तथा कार्यवाहीस अग्रेषित.
१५. डॉ.---------------------------------------------------- यांना माहितीस तथा अनुवर्तणास्तव अग्रेषित.
१६. निवड नस्ती.

स्वा/-
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी गडचिरोली**